## हरित संकल्पना ( Green Ideas ) या कार्यक्रमातंर्गत सुयोग्य प्रस्ताव निवडीसाठी सुकाणू समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २५ जुलै, २०१४ रोजी हरित संकल्पना या कार्यक्रमातंर्गत अ.मु.स.(पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. पी.एस.शेटे, उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
२) श्री.सो.ना.बागुल, उपसचिव, अर्थसंकल्प, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
३) श्री. संजय भुस्कुटे, जनसंपर्क अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई
४) श्रीमती. नसीमा शेख, उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) श्री. अभय पिंपरकर, शास्त्रज्ञ-१, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

सदर बैठकीत प्रथमत: यापूर्वी दिनांक ४ सप्टेंबर, २०१३ रोजी आयोजित सुकाणू समितीच्या बैठकीत निवड करण्यात आलेल्या प्रस्तावा बाबत चर्चा करण्यात आली. सदर निवड प्राप्त प्रस्ताव निधी मुक्ततेसाठी वित्त विभागाला सादर केले असता वित्त विभागाने निधी निश्चितीबाबत प्रथमत: सुकाणू समितीत निर्णय घेवून तद्नंतर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार खालील ०९ प्रस्ताव सुकाणू समितीच्या बैठकीत विचारार्थ घेण्यात आले.

| अ.क्र. | व्यक्ती/संस्थेचे नांव | योजनेचा संक्षिप्त तपिशल | संबंधितांना मार्फत प्रस्तावित निधी | सुकाणू समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | अस्तित्व महिला बहुउददेशीय संस्था | पर्यावरण पूरक सणांचे साजरीकरण महिला बचत गटातंर्गत नैसर्गिक रंग व पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनवून त्या बाजारपेठेत विक्रीस आणणे | २५लाख | मूळ प्रस्तावातील ६० महिला बचत गटाऐवजी ३० महिला बचत गटांना सक्षम बनवून त्यांच्यामार्फत नैसर्गिक रंग व गणेशमुर्ती बनविण्यात याव्यात. विभागामार्फत या योजनेसाठी रुपये ५ लाख एवढा निधी देण्यात यावा व उर्वरित निधीचा भार संबंधित संस्थेने उचलावयाचा आहे. सदर आर्थिक भार हा किमान ५० हजार एवढा असणे आवश्यक राहील. |
| २ | लोकरंजन बहुउददेशीय संस्था | लोकभाषेतून (तावडी मराठी व अहिराणी) पर्यावरण विषयक जनजागृती करणे. जामनेर तालुक्यातील सुमारे १३५ गावे | ९.६३ लाख | प्रस्तावित १३५ गावांऐवजी प्रथमत: ३० गावांत जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात यावेत. गावांची निवड करतांना गावातील लोकसंख्या, शौचालये उभारणे या बाबींचा सर्व तपशिल सदस्य सचिव, सुकाणू समिती यांना सादर करावा. प्रकल्पास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जनजागृतीव्दारे हगणदारी मुक्त करणे. | | विभागामार्फत रुपये २ लाख एवढा निधी देण्यात यावा व स्वत: संस्थेने कमीत कमी २० हजार रुपये या योजनेसोठी खर्च करावयाचा आहे. |
| ३ | निसर्ग विज्ञान मंडळ,नागपूर | मनुष्य व वन्य जीवांमधील संघर्ष टाळण्यासाठी जनजागृती करणे | ५.३७ लाख | "उमरेड करांडला वन्यजीव अभयारण्य",नागपूर येथील सिमेवरील वस्त्या, शाळा यामध्ये वन्यजीव व मनुष्य यातील संघर्ष टाळण्यासाठी जनजागृती करावयाच्या कार्यक्रमासाठी प्रस्तावित रुपये ५.३७ लाखा ऐवजी रुपये २ लाख निधी मंजूर करण्यात येत आहे. उक्त रक्कमेशिवाय किमान रुपये २० हजार एवढा खर्च संस्थेने करावयाचा आहे. |
| ४ | निर्सग जागर प्रतिष्ठान | परिसंस्थांचे संवर्धन | १०.४३लाख | पुणे जिल्हयातील कस्तुरीरंगन समितीच्या प्रस्तावित पर्यावरणीय संवेदनशिल श्रेत्र ( ESA )तील गौताळ प्रदेश (Grass land) यांचा GPSव्दारे मापन, मुल्यांकन करणे व गवताळ क्षेत्रातील विविधतेचा अभ्यास करुन सविस्तर अहवाल सादर करणे यासाठी रुपये ५ लाख निधी मंजूर करण्यात येत आहे. याशिवाय रुपये ५० हजार एवढा निधी संबंधित संस्थेने करावयाचा आहे. |
| ५ | वुमन सोसायटी फॉर इनव्हायरमेंट कल्चर ऑफ एज्युकेशन | कुंभमेळा अंतर्गत पर्यावरण विषायक जनजागृती | २७५ लाख | ज्या व्यक्ती/मुले / संस्था यांच्यामार्फत जनजागृती करावयाची आहे. त्या व्यक्तीची निवड संबंधित संस्थेने करावयाची असून प्रत्यक्ष जनजागृती कार्यक्रमासाठी रुपये ७ लाख एवढा निधी मंजूर करण्यात येत आहे. याशिवाय रुपये ७० हजार एवढा निधी संस्थेला करावयाचा आहे. |
| ६ | श्रीमती. केतकी घाटे | पारंपारिक पर्यावरणीय ज्ञानाचे संहितीकरण | १४.२९ लाख | पश्चिम घाट क्षेत्र जव्हार, नंदूरबार, मेळघाट,सिंधुदुर्ग, चंद्रपूर, गडचिरोली यासारख्या आदिवासी बहूल क्षेत्रे यांना भेटी देवून पांरपारिक ज्ञानाचे संकलन करुन ते पुस्तक वा फिल्म स्वरुपात तयार करणे या कार्यक्रमासाठी एकूण रुपये १४.२९ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. योजना पूर्ण होईपर्यत संबंधितांनी रुपये १.०० लाखाची बँक गॅरंटी पर्यावरण विभागास सादर करणे आवश्यक आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | श्रीमती सोनाली फडके | पर्यावरणीय शिक्षणासाठी विविध पर्यावरणीय कृती आराखडयाची आखणी करणे | ७.९१ लाख | पर्यावरण विषयबाबतची जाण विविध कृती आराखडयाव्दारे होण्यासाठी पर्यावरणीय शिक्षण कृती कार्यक्रमाची आखणी करणे व यावर आधारित ३ पुस्तकांचे विविध संच पर्यावरण विभागासाठी तयार करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. यासाठी ७.९१ लाख खर्चास मान्यता देण्यात आली असून योजना पूर्ण होईपर्यत संबंधितांनी रुपये ५० हजाराची बँक गँरंटी पर्यावरण विभागास सादर करणे आवश्यक आहे. |
| ८ | इकोएक्सिट | टाकावू वस्तु पुर्नचक्रीकरणकरुन त्यापासून सजावटीच्या विविध वस्तु तयार करणे | १४.७६ लाख | कचरा वेचकांच्या सहभागाव्दारे कच-यातील टाकावू वस्तु पूर्नचक्रीत करुन सजावटीच्या विविध वस्तु तयारकरणे या कार्यक्रमासाठी रुपये १० लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला. याशिवाय संस्थेस किमान १.०० लाख एवढा निधी स्वत:चा हिस्सा म्हणून खर्च करावयाची आहे. |
| ९ | वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट | पश्चिम घाटातील प्रदेशानिष्ट व लोप पावत असलेल्या प्रजातीची स्थिती नोंदवून त्यांच्या संवर्धनाबाबत कार्यवाही करणे. | १४.७६ लाख | संबंधित ट्रस्ट मार्फत पत्र व्यवहार करणारे श्री. गिरीश जाठार यांनी बैठकीच्या वेळी असे सूचीत केले की, सदर प्रस्ताव हा श्री. धर्मराज पाटील यांचे सह संयुक्तीकरित्या राबवू इच्छित आहे. याबाबत समितीने सविस्तर चर्चा करुन त्यांच्या नांवे प्रस्ताव देण्याच्या अटीवर व तसेच प्रस्तावाचा अभ्यास या पूर्वी BNHS या संस्थेमार्फत करण्यात आला नसल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रुपये ९ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला. याबाबत प्राप्त होणारा अंतिम अहवाल हा पर्यावरण विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे उभयतांनी मान्य केले. योजना पूर्ण होईपर्यत संबंधितांनी रुपये १.०० लाखाची बँक गँरंटी पर्यावरण विभागास सादर करणे आवश्यक आहे. |

ब)	जनजागृतीबाबत प्राप्त नवीन प्रस्ताव जानेवारी,२०१४ ते ३०जून, २०१४ या कालावधीत प्राप्त झालेले व नाविण्यपूर्ण संकल्पना असलेले पुढील प्रस्ताव समितीने विचारात घेतले याबाबत घेतेलेले निर्णय पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | व्यक्ती/संस्थेचे नांव | योजनेचा संक्षिप्त तपिशल | संबंधितांना मार्फत प्रस्तावित निधी (रुपये लाखात) | सुकाणू समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयास सेवाभावी संस्था,गेवराई | बीड जिल्हयातील बालाघाट पर्वत रांगामधील गावातून जैव विविधता मंडळाची स्थापना करुन गावातील जैव विविधता रजिस्टरच्या माध्यमातून गावातील जैव विविधतेचे जतन करणे. | ८.८० लाख | सदर प्रस्ताव यापूर्वीही समितीमार्फत विचारार्थ घेण्यात आला होता. दिनांक २९/३/२०१४ च्या शासन निर्णयाव्दारे रुपये ८ लाख निधी मुक्त करण्याची बाब सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यावर निधी मुक्त करावयाच्या अटीस अधीन राहून मान्यता देण्यात आली होती. प्राप्त सुधारित प्रस्ताव सुकाणू समितीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला असता बीड जिल्हयातील १० गावांची जैव विविधतेबाबत नोंदणी करण्याच्या अटीवर रुपये ३ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला. या शिवाय संस्थेस किमान रू.३०,०००/- एवढा निधी स्वत:चा हिस्सा म्हणून खर्च करावयाची आहे. |
| २ | स्वामी विवेकांनद बहुउददेशीय सेवाभावी संस्था | बीड व उस्मानाबाद जिल्हयातील पारधी व भिल्ल समाजातील सुशिक्षीत घटकांव्दारे मत परिवर्तन व जनजागृती करुन वन्यजीवांचे रक्षण करणे | २१ लाख | सुकाणू समितीने सदर प्रस्तावावर सखोल चर्चा करुन पर्यावरण विषयक जनजागृतीसंबंधी सदर प्रस्ताव अमान्य केला. |
| ३ | डॉ. महेश गायकवाड | वटवाघळांचे कषि व वन्य जैव विविधतेत असलेले आर्थिक महत्व | २२.५० | सुकाणू समितीने सदर प्रस्तावावर सखोल चर्चा करुन पर्यावरण विषयक जनजागृतीसंबंधी सदर प्रस्ताव अमान्य केला. |
| ४ | नेचर ॲड इनव्हायरमेंट सोसायटी, ठाणे | पक्षी हा घटक केंद्रस्थानी ठेवून आदिवासी आश्रम शाळेच्य | १२.०६ | पालघर येथील पालघर व त्या जवळच्या क्षेत्रातील आश्रमशाळा परिसरातील पक्षांसंबंधी जैव विविधतेविषयी जनजागृती करावयाच्या एकूण १२.०६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | परिसरातून जैव विविधतेविषयी जनजागृगती करणे. | | लाखाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या शिवाय संस्थेस किमान १.०० लाख एवढा निधी स्वत:चा हिस्सा म्हणून खर्च करावयाची आहे. |
| ५ | राजाराम कॉलेज विद्यानगर, कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हयातील पश्चिम घाट क्षेत्रातील विविध किल्ल्यामधील जलस्त्रोताचे सर्वेक्षण व संवर्धन करणे. | ३७.५ | प्रस्तावित कार्यक्रम प्रथमत: ५ किल्ल्यांची निवड करुन त्यावरील जलस्त्रोताचे संवर्धन व सर्वेक्षणासाठी रुपये ३ लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला. या शिवाय संस्थेस किमान ३००००/-एवढा निधी स्वत:चा हिस्सा म्हणून खर्च करावयाची आहे. |

क) जानेवारी २०१४ ते ३० जून,२०१४ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांपैकी नाविण्यपूर्ण संकल्पनेचे पुढील प्रस्ताव सुकाणू समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आले व त्यानुसार समितीने निर्णय घेतले.

| अ.क्र. | व्यक्ती/संस्थेचे नांव | योजनेचा संक्षिप्त तपिशल | संबंधितांना मार्फत प्रस्तावित निधी (रुपये लाखात) | सुकाणू समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामीण युवक क्रिडा शिक्षण बहुउददेशीय सेवाभावी संस्था | गाव पर्यावरण विकास प्रकल्प | ६ लाख | सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्रस्ताव अंमलबजावणी या वर्गवारीत सुयोग्य नसल्याचे मत समितीने निश्चित केले व प्रस्ताव अमान्य केला. |
| २ | NGO - Indian Herpetological Society | स्थायी पर्यावरणीय विकासाई विविध गोंष्टींचे पुर्नचक्रीकरण | २७.३२ | सुमारे ३० गावांतील १०० शाळांमध्ये तसेच स्थानिक युवक ग्रामीण महिला, आदिवासी बांधव यांना कार्यशाळेतून प्रशिक्षण देवून ऊर्जा, पाणी , टाकावू पासून टिकावू वस्तु बनविणे या सारख्या विविध बाबींचे प्रशिक्षण देणे यासाठी रुपये १५ लाख एवढानिधी मंजूर करण्यात आला. या शिवाय संस्थेस किमान १.५० लाख एवढा निधी स्वत:चा हिस्सा म्हणून खर्च करावयाची आहे. |
| ३ | इकॉलॉजिकल सोल्युशन | Restoration of Semiarid Grassland (To promote Conservation & Ecological | २३.४२ | सुकाणू समितीने सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करुन प्रस्तावित खर्चाचा विचार करता प्रस्ताव अमान्य करण्यात आला. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Restoration of grassland & scrub habitats in semi-arid & arid regions through community participation in a holistic manner.) | | |

उपरोक्त मंजूर प्रस्ताव व ज्या संस्थांचा मंजूर निधी हा कमालतम असून मान्य खर्चाच्या मर्यादेत सर्व संबंधितांकडून पर्यावरण विभागाने सविस्तर प्रस्ताव खर्चाच्या कालमर्यादेसह मागवून तो निधी मुक्त करण्याच्या पुढील मान्यतेसाठी नियोजन/वित्त विभागास सादर करावा.

उपस्थितांनाचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

-------------------